


## आमच्या ध्येयाचा उत्सव


# ‘प्रत्यैक मुलाच्या हाती पुस्तक’

## वार्षिक अहवाल २०२४-२५



# ध्येयाने

## भारलेली 20 वर्षं



# मनोगत

वाचन हे एक महत्त्वाचे प्रारंभिक कौशल्य आहे आणि तो ज्ञानार्जनासाठीचा भक्कम पायाही आहे. या कौशल्याचा मुलांच्या शैक्षणिक कामगिरीवर मोठाच परिणाम होत असतो. या कौशल्याचा त्यांच्या शाळेतल्या प्रगतीवरही प्रभाव पडत असतो. चांगली वाचनक्षमता असल्यास भाषेखेरीज इतर विषयही समजणे अत्यंत सोपे होते. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २००४ रोजी ‘प्रथम बुक्स’ची सार्वजनिक धर्मादाय संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली. या संस्थेच्या स्थापनेमागचे मुळातले उद्दिष्ट आहे – “प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक”.

हे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता आम्ही प्रकाशित करत असलेली पुस्तकं आकर्षक असावीत, ती स्थानिक संदर्भ असलेली असावीत आणि अगदी गरीब मुलांनाही स्वतःला घ्यायला परवडणारी असावीत, वा ती वाचनालये, इतर स्वयंसेवी संस्था आणि शासकीय शिक्षण विभागांद्वारे सहज उपलब्ध होऊ शकतील इतकी स्वस्त असावीत, या साऱ्यांकरताच्या काही अनोख्या कार्यपद्धती शोधाव्या लागल्या.

गेल्या काही वर्षांत आम्ही हे साध्य करण्याकरता अनेक प्रयत्न केले आहेत :

- आम्ही प्रिंटर्सबरोबर सखोल चर्चा व प्रयोग करून पुस्तकांचा उत्पादन खर्च कसा कमी करता येईल यावरचे उपाय शोधून काढले. खासकरून आम्ही एकावेळी अनेक भारतीय भाषांमध्ये छपाई करत असल्याने बचत करणे शक्य झाले. याकरता आम्ही विविध प्रकार वापरून पाहिले – स्टोरी कार्ड्स पासून पुस्तकांपर्यंत; घडी करता येणाऱ्या भिंतीवरील साहित्यापासून कागदाचा योग्य आकार वापरण्यापर्यंत अनेक असे प्रयोग केले, जेणेकरून वाया जाणारा कागद कमी असेल (पर्यायाने आर्थिक बचतही होईल).
- स्मार्टफोन आणि टॅब्लेटसारख्या डिजिटल साधनांचा वाढता वापर लक्षात घेऊन, आम्ही आशय व साहित्य ऑनलाइन मंचावरही उपलब्ध करून दिले आहे. हे आम्ही आमच्या स्टोरीविव्हर डिजिटल मंचाद्वारे उत्तम प्रकारे साध्य केले आहे.

या प्रयत्नांमुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी अधोरेखित झाल्या : पहिली गोष्ट एका विख्यात म्हणीत थोडासा बदल करून सांगता येईल : “एका मुलाला शिक्षित करण्यासाठी संपूर्ण गावाची गरज असते.” या म्हणीचा अर्थ असा की सरकार, समाज आणि बाजारपेठ यांचं सहकार्य असेल, तर अगदी तळातल्या मुलापर्यंत पुस्तकं पोहोचवणे शक्य होते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे २००८ मध्ये बिहार राज्य सरकारच्या सहयोगाने काम करून आम्ही फक्त ४९ दिवसांत बिहारमधल्या सुमारे ५४,००० शाळांमध्ये ३७.५ लाख पुस्तकं आणि ३७.५ लाख गोष्टींची कार्ड्स पोहोचवली. यामुळे आम्ही जवळपास ५५ लाख मुलांपर्यंत पोहोचलो.

आजच्या इंटरनेट युगात हे काम कदाचित सोपे वाटेल, पण त्या काळात ते खूप आव्हानात्मक होते. अगदी छोट्या टीमसह इतके मोठे आणि गुंतागुंतीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रथम बुक्सने आपली चिकाटी आणि बांधिलकी दाखवून दिली. तंत्रज्ञानाच्या युगात पुढे जात असताना, आम्ही ‘मिस्ड कॉल दो, कहानी सुनो’ यांसारखे अभिनव उपक्रम आणि स्टोरीविव्हरसारखे वापरायला सोपे, पण प्रभावी मंच तयार केले.

आज आम्ही लेखक, चित्रकार, साहित्य आणि वितरणप्रणाली यांचं एक भक्कम आणि प्रभावी जाळं विणलेलं आहे. दरवर्षी लाखो-कोट्यवधी मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. आणि यामुळे आपण पुढील टप्प्यावर पोहोचताना प्रश्न विचारला पाहिजे - या प्रचंड प्रमाणावर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा खरोखरच खोलवर होणारा परिणाम किती आहे? आणि हा परिणाम फक्त आलेल्या अनुभवांवर (म्हणजे जुन्या उदाहरणांवर) न मोजता आपण तो नेमकेपणाने कसा मोजू शकतो?

आम्ही या दिशेने पावले उचलायला सुरुवात केली आहे. पुढची काही वर्षे प्रथम बुक्ससाठी खूप उत्साहवर्धक असतील. आमची टीम हे आव्हान स्वीकारायला तयार आहे. राज्य सरकार, देणगीदार, इतर स्वयंसेवी संस्था आणि समाजासोबत सहकार्य करण्यासही आम्ही सज्ज आहोत. हे साध्य करण्याकरता आम्ही अनेक नवनवे प्रकल्प आखले आहेत. प्रथम बुक्सचा संस्थापक विश्वस्त म्हणून, हे प्रयत्न प्रत्यक्ष साकार होतानाचे परिणाम पाहण्याकरता मी खूप उत्सुक आहे.

*– अशोक कामत, संस्थापक विश्वस्त, प्रथम बुक्स*

आम्ही काही जणांनी मुलांसाठीच्या साहित्यामधली मोठी उणीव भरून काढण्याकरता प्रथम फाउंडेशनमध्ये प्रकाशन विभाग सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी मी, अशोक कामत आणि रेखा मेनन यांना या संस्थापक टीममध्ये सामील होण्याची विनंती केली होती. त्यानंतर १ जानेवारी २००४ रोजी आम्ही प्रथम बुक्सची स्थापना केली. वाचनाचा आनंद सर्व मुलांपर्यंत पोहोचवणे हा यामागचा उद्देश होता. भारतीय भाषांमध्ये सुंदर, विविध आणि स्थानिक पातळीवर भावणारा आशय असलेली पुस्तकं तयार करून आम्ही हे साध्य केले - आणि आम्ही त्यात यशस्वी झालो!

*– रोहिणी निलेकणी, सह-संस्थापक*

भारतभरातल्या मुलांना गोष्टींचा आनंद देण्याच्या आमच्या महत्त्वाकांक्षी स्वप्नाला प्रारंभ केल्यापासून ते गेल्या २० वर्षांत सर्वांना परवडणारी, उच्च गुणवत्ता असलेली आणि स्थानिक संदर्भ असलेली गोष्टींची पुस्तकं आणि कार्ड्स वितरित करण्यापर्यंतचा हा सगळा प्रवास खूपच विलक्षण होता. समाजाच्या हितासाठी आणि मोठ्या प्रमाणावर काम करण्यासाठी तंत्रज्ञानाची ताकद जोखून तिचा सुयोग्यपणे वापर करणे आणि जगभरातल्या अनेक भाषांमध्ये लाखो वाचकांपर्यंत पोहोचणे - हा एक अद्‌भुत वाटणारा प्रवास आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात साकार करणाऱ्या आणि गेल्या २० वर्षांत सोबत प्रवास करणाऱ्या टीमचे मनापासून अभिनंदन - लाखो मुलं तुमची आभारी आहेत!

*– रेखा मेनन, सह-संस्थापक*

प्रत्येक वेळी जेव्हा कृतीगट म्हणून किंवा वैयक्तिक पातळीवरही जेव्हा मी एखादी नवीन कल्पना किंवा नवोन्मेषाच्या संकल्पनेला सामोरी जाते, तेव्हा नेहमीच ती आमच्या ध्येयाला धरून आहे ना, या दृष्टिकोनातून मी पाहते. उदाहरणार्थ, अधिकाधिक गरजू मुलांच्या हातात आणखी पुस्तकं पोहोचतील का? यामुळे अधिक मुलांना वाचनाला प्रारंभ करता येईल का? यामुळे वाचनाच्या माध्यमातून मुलांसाठी नवीन संधींची द्वारे खुली होतील का? आम्ही कायम हाच विचार केला आणि असेच प्रयत्न आम्ही पुढेही करत राहू. पुढील काही दशकांत पुस्तकं बदलत जातील, तसेच ती वाचकांपर्यंत पोहोचण्याचे मार्गही बदलतील. पण पुस्तक आणि वाचक यांच्यात शब्द आणि चित्रांमुळे तयार होणारी जादू हीच कायम आमच्या कामामागची प्रेरणा राहील.

*– सुझान सिंग, माजी अध्यक्षा व विश्वस्त*

गेल्या दोन दशकांत, प्रथम बुक्सने नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे मुलांच्या पुस्तकांच्या क्षेत्रात एक मोठा बदल घडवून आणला आहे. प्रत्येक मुलापर्यंत कोणत्याही अडचणीची किंवा परिस्थितीची पर्वा न करता; उच्च दर्जाची, कमी किमतीची आणि अनेक भाषांमधली पुस्तकं, विविध माध्यमांतून पोहोचावीत यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. त्यामुळे भारतात आणि जगभर मोठ्या प्रमाणावर पुस्तकं पोचायला मदत झाली आहे. आम्ही पाहिले आहे की, अनेक भाषांतल्या गोष्टी मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, सहअनुभूती वाढवतात आणि वाचनाची आवड निर्माण करतात. त्याचा दूरगामी आणि सकारात्मक परिणाम होतो. या वर्धापनदिनाच्या निमित्ताने, आम्ही लेखक, चित्रकार, अनुवादक, स्वयंसेवक, भागीदार, देणगीदार आणि समर्थक या सर्व समुदायाचे मनापासून आभार मानतो. तुमच्या सततच्या पाठिंब्यामुळेच आम्हाला लाखो मुलांपर्यंत, विशेषतः वंचित आणि दुर्लक्षित मुलांपर्यंत पोहोचता आले आणि त्यांच्यावर सकारात्मक परिणाम घडवता आला.

*– आर. श्रीराम, अध्यक्ष*

प्रत्येक मुलाचा वाचनासाठीचा मजबूत पाया तयार करण्यासाठीची

# २० वर्षं



जेव्हा प्रथम बुक्सने भारतातल्या प्रत्येक मुलाला वाचनातून आनंद मिळवून देण्याचे ध्येय समोर ठेवले, तेव्हा आम्ही तीन प्रमुख समस्यांवर लक्ष केंद्रित केले होते : मुलांकडे त्यांच्या मातृभाषेतली, परवडणारी आणि दर्जेदार पुस्तकं नव्हती, शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त फारसे कुठले वाचनसाहित्य उपलब्ध नव्हते, समाजामध्येही मुलांना वाचनाची सवय लागावी याकरताच्या आवश्यक सुविधा कमी प्रमाणात होत्या.

म्हणूनच, आम्ही या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा निर्णय घेतला.



गेल्या २० वर्षांत, आमच्या या प्रवासाची व्याप्ती अगदी बिहारमधल्या जिल्हा कार्यालयांपासून मणिपालमधल्या छापखान्यांपर्यंत, पूर्वेकडील गारो हिल्सपासून ते पश्चिमेकडल्या कच्छच्या रणापर्यंत पसरलेली आहे. विविध लोक, ठिकाणे आणि गोष्टींनी भरलेल्या या प्रदीर्घ प्रवासात, वाचनप्रेमी भारतवासीयांसाठी आम्ही तीन मुख्य तत्त्वांवर आधारलेले काम करत आहोत :

१. निर्मिती : प्रथम बुक्सच्या संग्रहात आता ७,०००पेक्षा जास्त प्रकाशित पुस्तकं आहेत. ही पुस्तकं म्हणजे भारतीय लेखकांनी निर्माण केलेल्या भारतीय मातीतल्या गोष्टी आहेत. त्या मुलांना स्वप्न पाहायला, शिकायला आणि वाढायला मदत करतात.

२. उपलब्धता : प्रत्येक मुलापर्यंत गोष्टी पोहोचवण्याकरता आम्ही सरकारी यंत्रणांसोबत मोठ्या प्रमाणावर काम करतो, विविध समुदायांच्या मदतीने अधिक मुलांपर्यंत पोहोचतो आणि बाजारपेठेतल्या वितरणव्यवस्थेच्या माध्यमातून वितरित करतो.

३. वापर : आमच्या मोठ्या चित्रपुस्तकांच्या संग्रहाचा वापर करून आम्ही गोष्टींवर आधारित कार्यक्रम तयार करतो, ज्यामुळे मुलांच्या शिक्षणात पडलेली दरी भरून काढण्यास मदत होते.



आमच्या पहिल्या दशकात, आम्ही एक सर्वसामान्यांना परवडेल अशा पुस्तकांच्या प्रकाशनाचे मॉडेल तयार केले, बहुभाषिक आणि सर्जनशील पुस्तक निर्मितीचा कार्यक्रम तयार केला आणि राज्यव्यापी वितरण करण्याची क्षमता विकसित केली.

- २००६ पर्यंत, हिंदी, बंगाली, गुजराती, आसामी, बोडो, तमिळ, उर्दू आणि पंजाबीसह भारतभर जवळपास १ कोटी गोष्टींची कार्ड्स वितरित केली गेली.
- २००८ मध्ये, बिहार राज्य सरकारच्या सहकार्याने, आम्ही ५४,००० शाळांमध्ये ३.७५ लाख पुस्तकं आणि ३.७५ लाख गोष्टींची कार्ड्स फक्त ४९ दिवसांत वितरित केली, ज्यायोगे आम्हाला ५.५ लाख मुलांपर्यंत पोहोचता आले.
- २०१२ पर्यंत, आमची चित्रपुस्तकं २१ राज्यांपर्यंत पोहोचली, लडाखमधल्या समाज केंद्रांपासून आसाम आणि मेघालयमधल्या चहाच्या बागांपर्यंत, तसेच गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक आणि झारखंडमधल्या ग्रामीण शाळांपर्यंत ती वितरीत केली गेली.

## २००४-२०१४

**बहुभाषिक आणि परवडतील अशी गोष्टींची पुस्तके सहजपणे मुलांपर्यंत पोचावीत म्हणून संधी आणि मार्ग उपलब्ध करून देणे.**

### चित्रपुस्तकांद्वारे पर्यावरणप्रेम विकसित करणे

आमचे पहिले पर्यावरणविषयक (ग्रीन-लिट) पुस्तक होते कावेरी (२००९). हे पुस्तक ओरिओल हेन्री यांनी लिहिले होते आणि क्लेअर अर्नी यांनी त्यासाठीची छायाचित्रे काढली होती. चित्रपुस्तकं पृथ्वीच्या संरक्षणासाठी कशा प्रकारे प्रेरणा देऊ शकतात ते या पुस्तकाने दाखवून दिले.

या पुस्तकामुळे संपूर्ण देशभर “आपल्या नद्या जपा, पाणी वाचवा” हे अभियान सुरू झाले. त्यात १,२२,००० लोकांनी जलस्रोतांचे संरक्षण करण्याची प्रतिज्ञा केली.

### मातृभाषेतल्या गोष्टी जतन करणे

प्रथम बुक्सने *आदिकहानी* या मालिकेद्वारे सर्वप्रथम आदिवासी भाषांमधल्या पुस्तकनिर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवले. यामध्ये कार्यशाळांच्या माध्यमातून ओडिशातल्या आदिवासी समुदायांसोबत १० पुस्तकं आणि ४ गाण्यांची कार्ड्स तयार केली गेली. सौरा शैलीत चित्रित केलेली आणि कॉन्टेंट पार्टनर ‘इग्नस इआरजी’च्या साहाय्याने विकसित केलेली ही मालिका २०१५ मध्ये ‘पब्लिशिंग इनोव्हेशन ऑफ द इयर’ पुरस्कार विजेती ठरली.



जसा आमचा हा कामाचा प्रवास पुढे गेला, तसं आमच्या लक्षात आलं की फक्त नवनव्या गोष्टी तयार करणं पुरेसं नाही, तर त्या गोष्टी भौगोलिक सीमा, भाषा, विविध यंत्रणा आणि समुदायांपर्यंत पोहोचायला हव्या. त्याकरता २०१४ मध्ये आम्ही डिजिटल तंत्रज्ञान आणि सामूहिक सहभागाच्या मदतीने वाचनसामग्री सर्वांपर्यंत पोहोचवण्याकरताचे नवनवे मार्ग तयार करण्यास सुरुवात केली. त्यातून दोन महत्त्वपूर्ण उपक्रम पुढे आले.

त्यातलाच डोनेट-अ-बुक हा आमचा क्राउडफंडिंग मंच आहे. ज्या समाजगटांना वाचनालयांची गरज आहे, त्यांना हा मंच मदत करू इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांशी जोडतो.

पहिल्याच वर्षात, या उपक्रमामुळे जवळपास ५०,००० पुस्तकं वितरित करण्यासाठी निधी उभारला गेला आणि देशातल्या दुर्गम भागांतल्या १० लाखांहून अधिक मुलांना त्याचा लाभ घेता आला. स्वयंसेवकांनी ग्रामीण तमिळनाडूमधल्या इरुला जमातीतल्या मुलींसाठी निधी उभारण्यापासून ते कोलवाडीसारख्या लहान गावांतल्या शाळांपर्यंत, अनेक समुदायांनी स्वतःहून त्या त्या ठिकाणी ग्रंथालयांसाठी जागा निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारली. यामुळे प्रत्येक मुलापर्यंत गोष्टी पोहोचवण्यासाठी घेतलेल्या सामूहिक जबाबदारीची एक चळवळच सुरू झाली.

## २०१४-२०१८

### स्टोरीविव्हर मंच, भागीदारी आणि समुदाय यांच्या माध्यमातून विस्तार

स्टोरीविव्हर या डिजिटल मंचाने वाचनसामग्रीपर्यंत पोहोचण्याची संकल्पनाच पूर्णपणे बदलून टाकली असे म्हणता येईल. सुरुवातीला ८०० मुक्त वापर परवाना (open-licensed) गोष्टींपासून सुरू झालेला हा उपक्रम, आज एक जगातला महत्त्वाचा डिजिटल सार्वजनिक संसाधन (Digital Public Good) बनला आहे. आज स्टोरीविव्हरवर जगातल्या ३८० पेक्षा अधिक भाषांमधल्या ६०,००० पेक्षा अधिक गोष्टी उपलब्ध आहेत. या गोष्टींचा सातत्याने अनुवाद केला जातो, त्या स्थानिक संदर्भानुसार रूपांतरित केल्या जातात आणि जगभरात पुन्हा निःशुल्क तत्त्वावर वितरित केल्या जातात.

PRATHAM BOOKS donate-a-book

PRATHAM BOOKS storyweaver

या समुदायातल्या स्वयंसेवकांनी स्टोरीविव्हरच्या माध्यमातून हिंदी चित्रपुस्तकांचे गोंडी भाषेत अनुवाद केले आहेत, ज्यामुळे मनीषासारख्या मुलांना त्यांच्या आयुष्यात प्रथमच आपल्या मातृभाषेतले पुस्तक हाती घेता आले.





डोनेट-अ-बुक मंचावर मँगो ट्री या संस्थेने क्राउडफंडिंगद्वारे उभारलेल्या निधीतून मिळालेल्या चित्रपुस्तकांसह मुलं

वाचनप्रेमींचा भारत उभारण्यासाठी डोनेट-अ-बुकने गेल्या १० वर्षांत केलेल्या कामाच्या आढावा घेण्यासाठी स्कॅन करा!

२०२०

## गोष्टींना ज्ञानार्जनाचे साधन बनवून त्याद्वारे संस्थात्मक यंत्रणा स्तरांवर बदल घडवून आणणे

कोव्हिड-१९ च्या महासाथीमुळे देशभरातल्या शाळांमधले वर्ग बंद झाले असताना, एससीईआरटी, महाराष्ट्र आणि युनिसेफ यांच्या सहयोगाने, प्रथम बुक्सने 'गोष्टींचा शनिवार' हा उपक्रम सुरू केला. हा उपक्रम १,००,००० शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये राबवण्यात आला. या नियमित आणि योजनबद्ध कथासत्रांमुळे लाखो मुलांचे शिक्षण सुरू राहिले.

*पालघर, महाराष्ट्र येथील जिल्हा परिषद शाळेतली इयत्ता पहिलीतली विद्यार्थिनी शांभवी पाटील हिला बालमधुमेह असल्यामुळे तिचा अभ्यासातला रस कमी झाला होता. 'गोष्टींचा शनिवार'मुळे ती दर शनिवारी शिक्षकांच्या मदतीने रंगीत आणि आकर्षक गोष्टींची पुस्तकं वाचू लागली.*

*हळूहळू शांभवी प्रश्न विचारू लागली, गोष्टींवर चर्चा करू लागली आणि वर्गात सक्रियपणे व उत्साहाने सहभाग घेऊ लागली.*

## व्यापक स्तरावर प्रारंभिक साक्षरता कौशल्य बळकट करणे

*कोव्हिडच्या महासाथीनंतर, आम्ही निपुण भारत मिशन आणि राष्ट्रीय शैक्षणिक उद्दिष्टांशी सुसंगत असणारा 'फाउंडेशनल लिटरसी प्रोग्रॅम' सुरू केला. याचा उद्देश इयत्ता १ली ते ३रीमधल्या मुलांना "वाचायला शिकणे" या टप्प्यापासून "वाचून शिकणे" या टप्प्यापर्यंत नेणे असा आहे. हा कार्यक्रम हिंदी आणि मराठी भाषेत विकसित करण्यात आला असून, तो वर्गातल्या अध्यापनासाठी तसेच शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्याकरता उपयुक्त आहे. राज्य शिक्षण विभागांच्या सहकार्याने, हा कार्यक्रम छत्तीसगडमधल्या ३०,००० प्राथमिक शाळा आणि २६ लाख मुलांपर्यंत, तसेच महाराष्ट्रामधल्या ४२,००० शाळा आणि ४० लाख मुलांपर्यंत पोहोचला आहे.*

*आमच्या मूलभूत साक्षरता उपक्रमांमध्ये, क्षेत्रीय अभ्यासांनुसार ध्वनीबद्दलची जाणीव, शब्द वाचन आणि आकलन यामध्ये १५ ते ४० टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तसेच, स्वतंत्रपणे गोष्टी वाचू शकणाऱ्या मुलांचे प्रमाण ४४% वरून ८२%पर्यंत वर गेले आहे.*

आजपर्यंत, आमचे मिश्र (हायब्रीड) म्हणजे गोष्टींवर आधारित शिक्षण कार्यक्रम ७२,००० शाळांमध्ये राबवले गेले असून ते सुमारे ७०लाख मुलांपर्यंत पोहोचले आहेत.



## गोष्टींच्या माध्यमातून स्टेम STEM शिक्षणाची वाट

आमच्या गोष्टींवर आधारित दृष्टिकोनाचा विस्तार आता स्टेम शिक्षणाकरताही झाला आहे. ‘स्टेम गोष्टी’ या उपक्रमाच्या अंतर्गत, अभ्यासक्रमाशी निगडित अशा २०० हून अधिक चित्रपुस्तकांचा वापर केला जातो. त्यामुळे मुलांच्या मनामध्ये वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण होते. यासोबतच शिक्षकांनाही प्रशिक्षण दिले जाते, त्यामुळे लहान वर्गांपासूनच विज्ञानाधिष्ठीत विचारसरणी विकसित होते.

कोटा, राजस्थान येथील सरकारी शाळांमध्ये केलेल्या पथदर्शक कार्यक्रमातून तो किती प्रभावी आहे हे दिसून आले. या कार्यक्रमापूर्वी आणि नंतरच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या स्टेम विषयांच्या आकलनात ३३ टक्के गुणांची वाढ (आधीच्या ४२% वरून नंतर ७५% पर्यंत) झालेली दिसून आली. तसेच, उपयोजित स्टेम कौशल्यांमध्ये २८ टक्के गुणांची वाढ आणि ज्ञानप्राप्तीबाबतच्या दृष्टिकोनातही ३२ टक्के सुधारणा झालेली आढळली.

## चित्रपुस्तकांच्या माध्यमातून लिंगभेदाच्या रूढ कल्पनांना आव्हान

लिंगभेदाचा विचार मनात न आणता मुलं स्वतःच्या इच्छेनुसार भविष्यात यशस्वीरीत्या हवे ते करिअर करू शकतात हे पटवून देणाऱ्या गोष्टी मुलांकरता आवश्यक असतात. पारंपरिक लिंगभाव आधारित भूमिकांपेक्षा वेगळ्या भूमिका पार पाडणाऱ्या पात्रांवर भर देणाऱ्या गोष्टी निवडून त्यावर आधारित शिक्षण कार्यक्रम आम्ही विकसित केला. भारतातल्या पारंपरिक आणि मर्यादित लिंगभाव भूमिकांना चोख उत्तर देणाऱ्या या गोष्टी होत्या.

युनिसेफच्या लिंग समभाव उपक्रमाच्या अंतर्गत, प्रथम बुक्सने ‘ओपन बुक्स, ओपन डोअर्स, ओपन माइंड्स : जेंडर ट्रान्सफॉर्मेशन थ्रू स्टोरीबुक्स’ हा कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम इयत्ता १ली ते ५वीमधल्या मुलांमध्ये लिंगसमभावाबाबत जागरूकता निर्माण करण्याकरता पुस्तकांचा प्रभावी वापर करतो.

धाराशिव, महाराष्ट्र येथे राबवलेल्या अशा पथदर्शक कार्यक्रमात लक्षणीय बदल दिसून आला. सुरुवातीच्या मूल्यांकनात केवळ ५१% मुलींना मुलगे आणि मुली दोघेही पोलिस अधिकारी होऊ शकतात असे वाटत होते, मात्र कार्यक्रमानंतरच्या अंतिम मूल्यांकनात हे प्रमाण ९३% पर्यंत वाढले.

*युनिसेफ महाराष्ट्रासोबतच्या आमच्या पथदर्शक कार्यक्रमाचा प्रभाव पाहण्याकरता क्यूआर कोड स्कॅन करा!*

TWENTY YEARS OF PRATHAM BOOKS

# यशोगाथेची झलक:

7000+
चित्रपुस्तकं प्रकाशित

32+
भाषांमध्ये मुद्रित पुस्तकं

380+
भाषांचा वापर

~200K
सरकारी शाळांपर्यंत पोहोचलो


35+M
चित्रपुस्तकांचे वितरण

~5000
प्रत्यक्ष काम करणारे भागीदार

10+M
डिजिटल वापरकर्ते

250M
डिजिटल मंचावरील वाचल्या गेलेल्या गोष्टी

12+
शासनाच्या सहयोगाने सुरू असलेले उपक्रम



आमची चित्रपुस्तकं भारतातल्या २६ राज्यांत आणि ६ केंद्रशासित प्रदेशांमध्ये उपलब्ध आहेत.



# वार्षिक आढावा :


२०२४ मध्ये आम्ही २०वा वर्धापनदिन साजरा केला. एक संस्था म्हणून आम्ही सर्वोत्तम गोष्ट करत राहतो – ती म्हणजे भारतामध्ये आनंददायी आणि सर्वसमावेशक वाचन संस्कृती निर्माण करण्याकरता काम करणे.





# चित्रपुस्तकांचा उत्सव :

आमच्या संपादकीय टीमने दृश्य साक्षरता (व्हिज़ुअल लिटरसी) वाढवण्याकरता पुढाकार घेतला आहे. उंदरू आणि मांजरू (लेखिका: अरुंधती वेंकटेश, चित्रांकन: कनातो जिमो), ही धरती माझी शाळा : दादाजी खोब्रागडे भारताचा भातपुरुष (दादाजी खोब्रागडे यांची चरित्रकथा, लेखक: योगेश मैत्रेय, चित्रांकन: भार्गवी रुद्रराज़ू), शब्दांविरहित पुस्तक कबड्डी कबड्डी (काबिनी अमीन) आणि शोधाल तर सापडेल! - शोधा पाहू! (हितेश सोनार) यांसारख्या पुस्तकांद्वारे आम्ही विविध प्रकारची दर्जेदार बालचित्रपुस्तकं प्रकाशित केली.

तसेच, नव्या पिढीतल्या लेखक-चित्रकारांमध्ये दृश्य साक्षरता विकसित करण्याकरता आम्ही अनेक कार्यशाळा आणि हॅकथॉन आयोजित केल्या. हे उपक्रम नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन, सृष्टी मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी आणि ख्राइस्ट (अभिमत विद्यापीठ) यांसारख्या महाविद्यालयांत व विद्यापीठांमध्ये घेण्यात आले.









## चित्रपुस्तकांमधून आदिवासी कलाप्रकारांचा शोध :

प्रथम बुक्सने भारतभरातल्या सहा आदिवासी महिला कलाकारांना एका कार्यशाळेसाठी आमंत्रित केले. त्यांनी *आम्हाला काय वाटतं?* हे चित्रपुस्तक तयार केले. त्यामध्ये त्यांच्या स्वप्नांचा आणि आकांक्षांचा वेध घेतलेला आहे. या पुस्तकात पटचित्र ते फड अशा सहा पारंपरिक कला शैलींचा वापर करण्यात आला आहे.





जागतिक कलादिनानिमित्त, हे पुस्तक देशभरातल्या मुलांसोबत घेतलेल्या सत्रांमधला केंद्रबिंदू ठरलं. मुलांना कलेच्या माध्यमातून आपली स्वप्नं व्यक्त करण्याकरता प्रोत्साहित करण्यात आलं. मुलांनी या सत्रांना खूप उत्साहाने प्रतिसाद दिला. ९ वर्षांच्या यशिकाने रंगांमध्ये अवकाशाची कल्पना केली. १० वर्षांच्या सौम्याला इतकी प्रसिद्ध लेखिका व्हायचे आहे, की तिला आपला वाढदिवस 'जागतिक लेखक दिन' म्हणून साजरा व्हावा असे वाटते. ११ वर्षांच्या आरोहीला सूर्य आपला जिवलग मित्र असावा असं वाटतं, तर ११ वर्षांच्या नाविकाने उच्च शिक्षण घेण्याचा तिचा निर्धार चित्रातून मांडला.





## चित्रपुस्तकांद्वारे शिक्षण :

आम्ही, *मुंग्यांनी भरलेला चांदोबा* (अपर्णा कपूर आणि प्रिया कुरियन), *हुय्या हुप्पा! क्रिकेट कल्ला* (लावण्या कार्तिक, चित्रांकन: पंकज सैकिया), *नीलू आणि जुबैदा* (असमां नूर) आणि *मी मांजर नाहीये* (पारो आनंद, चित्रांकन: डेविड याम्बेम) यांसारखी रंगीत आणि मोठ्याने वाचून दाखवण्यासाठी योग्य पुस्तकं प्रकाशित करत राहिलो. याशिवाय, मुलांना भावना समजून घेण्यास मदत करणारी सामाजिक आणि भावनिक शिक्षण विषयावरच्या चित्रपुस्तकांच्या निर्मितीची संख्यादेखील वाढवली. यामध्ये प्रथमच पुस्तक तयार करणाऱ्या ऋषिता लोईताँगबम यांचं शब्दविरहित *लाजाळू थोइथोइ*, जयराज सिंग यांचं *पुस्तकांनी भरलेलं घर* (चित्रांकन : ऐंद्री सी.), तसेच *कुरकुरी मुलगी* (कोमिला रावते, चित्रांकन : शुभश्री माथुर), *पिकूची किमयागार आत्या* (सौमक घोशाल, चित्रांकन : प्रोईती रॉय) आणि *तेजस्वी तारा* (श्रीजा राव, चित्रांकन : कृत्तिका सुसर्ला) यांसारखी पुस्तकं समाविष्ट आहेत. ही पुस्तकं आपल्या आजूबाजूच्या जगाचे संवेदनशील प्रतिबिंब दाखवतात. जगात वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, आम्ही शांततेवर आधारित *एकाच आकाशाखालची स्वप्नं* (फॉस्टो आर्या दे सॅन्टिस, चित्रांकन : ओगिन नयम) हे पुस्तकही प्रकाशित केले.





प्रथम बुक्सला पर्यावरण संरक्षण आणि जागतिक हवामान संकट याबद्दल मुलांना समजावून सांगणारी चित्रपुस्तकं प्रकाशित करण्याचा मोठाच अनुभव आहे. या वर्षी आम्ही भारतातल्या संवर्धनाच्या प्रयत्नांवर आधारित दोन पुस्तकं प्रकाशित केली-*खवले मांजराला कसं वाचवलं?* (लेखिका : राधा रंगराजन, चित्रांकन : राजीव आईप) आणि *बंब : एक जादुई नळकांडी* (लेखिका : मीनू थॉमस, चित्रांकन : रोहित केळकर). प्रथम बुक्सने बेंगळुरूमध्ये झालेल्या *Trialogue Days – Planetary Health from Different Perspectives: Mind the Gap* या कार्यक्रमातही सहभाग घेतला. यात भारत, स्वित्झर्लंड आणि युगांडा येथील शास्त्रज्ञांनी आणि कलाकारांनी एकत्र येऊन पृथ्वीच्या संवर्धनाबाबतचे आपले विचार आणि प्रयत्न इतरांसमोर मांडले. या प्रयत्नांचे चित्रण *One Earth: Planetary Health for All* या चित्रपुस्तकात करण्यात आले आहे.



## चित्रपुस्तकांद्वारे स्टेम शिक्षण :

प्रथम बुक्सकडे स्टेम विषयांवरील समृद्ध चित्रपुस्तकांचा संग्रह आहे. याद्वारे गोष्टींच्या पुस्तकांच्या माध्यमातून मुलांमध्ये नव्या गोष्टींचा शोध घेण्याची उत्सुकता आणि सहभाग वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. राज्याच्या माध्यमिक इयत्तांमधल्या विद्यार्थ्यांच्या सुधारणेसाठी पूरक शिक्षण कार्यक्रम राबवला जातो. छत्तीसगडमध्ये, समग्र शिक्षण अभियानाच्या सहकार्याने, या स्टेम गोष्टींवर आधारित शिक्षण पद्धतीचा अंतर्भाव केला गेला. आगामी राष्ट्रीय उपलब्धी सर्वेक्षण (NAS) लक्षात घेऊन, विज्ञान आणि गणितातल्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्याकरता हे एक महत्त्वाचे साधन म्हणून निवडले गेले आहे. या सहयोगाच्या अंतर्गत, स्टेम चित्रपुस्तकांचा वापर करून मुलांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा कशी वाढवावी याचे प्रशिक्षण आम्ही राज्यभरातल्या ५,००० शिक्षकांना दिले आहे.

"प्रथम बुक्सच्या स्टेम गोष्टींमुळे मुलांना संकल्पना पटकन समजायला मदत झाली. उदाहरणार्थ, संविदा वेंकटेश यांनी लिहिलेली आणि संध्या प्रभात यांनी चित्रांकित केलेली *लपाछपी* ही गोष्ट माझ्या विद्यार्थ्यांना वजाबाकीची संकल्पना इतकी स्पष्टपणे समजावून सांगते की, एरवी जे शिकवण्यासाठी मला सहा महिने लागले असते, ते या पुस्तकामुळे सहजसाध्य झाले."

*– श्रीमती सीमा आचार्य, शिक्षिका, शासकीय विद्यालय, कोटा*

# भाषांचा उत्सव :

मुलं रोज ज्या भाषेत बोलतात, विचार करतात आणि स्वप्न पाहतात, त्याच भाषेत त्यांना वाचायला शिकणे सर्वात सोपे जाते, यावर आमचा दृढ विश्वास आहे. गेल्या दोन दशकांत आम्ही ३२ हून अधिक भारतीय भाषांमध्ये चित्रपुस्तकं प्रकाशित केली आहेत. त्यामध्ये मुख्य प्रवाहातल्या, तसेच आदिवासी भाषा समाविष्ट आहेत. शिवाय, आमच्या स्टोरीविव्हर या डिजिटल मंचावर 380 हून अधिक भाषांमधली चित्रपुस्तकं उपलब्ध आहेत.

गेल्या वर्षात आम्ही २४ नवीन पुस्तकं प्रकाशित केली. त्यापैकी ८ मूळ प्रादेशिक भाषेत तयार केली गेली उदाहरणार्थ, कन्नड, मराठी आणि हिंदी भाषांमध्ये दीपा भास्ती, कोलेगला शर्मा, माधुरी पुरंदरे आणि वसिमबारी मणेर यांसारख्या नामवंत लेखकांनी पुस्तकं लिहिली. नंतर या गोष्टी अनुष्का रविशंकर, जयंत कायकिणी आणि श्रीनाथ पेरूर यांसारख्या पुरस्कारप्राप्त लेखकांनी इंग्रजी आणि अन्य प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित केल्या.






मातृभाषेत उत्तम दर्जाचे बालसाहित्य उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेनुसार, या वर्षीही आम्ही १३० हून अधिक अनुवाद केले आहेत. यामध्ये ईशान्य भारतावर विशेष भर देत, आसामी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये ५० हून अधिक नवीन गोष्टी प्रकाशित केल्या आहेत. भारतीय भाषांमध्ये थेट अनुवाद करण्याची पद्धत वाढवून आणि कुशल अनुवादकांचे जाळे निर्माण करून आम्ही आमचा 'प्रादेशिक भाषा-प्रथम' हा दृष्टिकोन अधिक बळकट केला आहे. विविध विद्यापीठांच्या भाषा विभागांसोबतच्या सहकार्यामुळे आणि शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे अधिकाधिक शिक्षक आणि ग्रंथपाल चित्रपुस्तकांचे अनुवाद करण्यासाठी पुढे आले आहेत.

आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त, आम्ही 'एक स्टेप' संस्थेच्या बचपन मनाओ या उपक्रमात सहभागी होऊन, स्टोरीविव्हर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत २५० हून अधिक सहभागींना प्रशिक्षण देऊन त्यांना मुलांसाठी वाचनपातळीनुसार चित्रपुस्तकं योग्य प्रकारे कशी अनुवादित करावीत हे शिकवले.


## मातृभाषांमध्ये विशिष्ट विषयांवरच्या साहित्याचा विस्तार :

या वर्षी, प्रथम बुक्सने ‘फ्रेंच इन्स्टिट्यूट इन इंडिया’ यांच्या सहयोगाने नोबेल पारितोषिक विजेत्या एस्थर दुफ्लो यांनी लिहिलेल्या पुस्तकांची मालिका बालवाचकांसाठी प्रकाशित केली. ही मालिका पुअर इकॉनॉमिक्स फॉर किड्स वर आधारित असून दारिद्र्य आणि असमानता यातून मार्ग काढणाऱ्या या गोष्टी आहेत. फ्रेंच चित्रकार, शाय्येन ऑलिव्हिए यांनी यासाठी चित्रांकन केले असून ही मालिका मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ आणि मल्याळम अशा पाच भारतीय भाषांमध्ये प्रकाशित झाली आहे.





या मालिकेच्या मराठी आणि मल्याळम अनुवादांच्या प्रती हातात घेतलेल्या, चित्रकार शाय्येन ऑलिव्हिए आणि लेखिका एस्थर दुफ्लो



“नोबेल पारितोषिक मिळाल्यावर मला नोबेल संग्रहालयाला एक वस्तू भेट देण्याची विनंती केली गेली होती. त्या संग्रहालयाला मी प्रथम बुक्सची काही पुस्तकं भेट दिली, कारण या प्रकाशनसंस्थेने भारतभरातल्या मुलांच्या वाचनासाठी केलेले काम महत्त्वाचे आहे. आता माझी स्वतःची पुस्तकेही प्रथम बुक्सकडून प्रकाशित झाली आहेत, याचा मला अभिमान वाटतो. नीलू आणि तिच्या मित्रांच्या गोष्टींमधून बालवाचकांना आनंद मिळेल असा मला विश्वास वाटतो. ही पुस्तकं विविध भाषांमध्ये प्रकाशित केल्याबद्दल प्रथम बुक्सचे आभार. यामुळे खूप मोठा बदल घडून येऊ शकतो. शिक्षक आणि पालक या पुस्तकांचा वापर करतील अशी मला आशा आहे.”

– एस्थर दुफ्लो, नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थतज्ज्ञ

# वाचनप्रिय भारत घडवण्याचा उत्सव :



प्रथम बुक्सने देशभरातल्या विविध भागीदारांसोबतचा सहयोग अधिक भक्कम करत, उच्च गुणवत्ता असणारे बालसाहित्य अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरूच ठेवले आहे. अगदी दुर्गम भागातही हे कार्य सुरू आहे.

जयपूर लिटरेचर फेस्टिव्हलसोबतच्या आमच्या शाळा संपर्क सहयोग अभियानाला सन २०२५ मध्ये १५ वर्षं पूर्ण झाली. या सहयोगामुळे कथा, कल्पना आणि प्रेरणा अगदी वर्गावर्गांपर्यंत पोहोचल्या. गेल्या १५ वर्षांत, या उपक्रमाच्या अंतर्गत ५०० संस्थांमध्ये १००० हून अधिक चर्चासत्रं आयोजित करण्यात आली, ज्यांतून आम्हाला ५०,००० हून अधिक मुलांशी संवाद साधता आला.

या सत्रांमुळे मुलांसाठी इतिहास, तंत्रज्ञान आणि विज्ञान या विषयांतल्या नव्या दालनांची दारे उघडली. या वर्षी अक्षता मूर्ती, कल्लोल भट्टाचार्य आणि राजदूत हार्वे डेल्फिन यांसारख्या वक्त्यांनी मुलांमध्ये सर्जनशीलता आणि वाचनाची आवड निर्माण करण्यास मदत केली. झारखंडमधल्या गमला बुक फेअर आणि दिल्लीतल्या वर्ल्ड बुक फेअर २०२५ मध्ये सहभागी होऊन, आम्ही शिक्षक आणि समुदायांसाठी पुस्तकं आणि वाचन-अनुभव या गोष्टी अधिक सहजगत्या उपलब्ध करून दिल्या.

### शासनासोबतच्या सहयोगाद्वारे संपर्क अधिक मजबूत :

या वर्षी प्रथम बुक्सने १०.७ लाख चित्रपुस्तकांचे वितरण केले, ज्यामुळे भारतभरातल्या सुमारे ३५ लाख मुलांपर्यंत आमचे काम पोचले. झारखंड, तेलंगणा, दादरा आणि नगर हवेली तसेच दमण आणि दीव येथील संस्था आणि शिक्षण विभागांसोबतच्या सहकार्यामुळे, आमची पुस्तकं एरवी दुर्लक्षित असणाऱ्या भागांतल्या शाळा आणि शिक्षण केंद्रांपर्यंत पोहोचली.

आम्ही शिक्षण विभागांसोबतच्या आमच्या सध्याच्या सहयोगाला अधिक बळकट करत, गोष्टींच्या माध्यमातून अगदी लहान वयातच स्टेम शिक्षणाला सुरुवात करण्यास चालना दिली. स्टोरीविव्हरच्या स्टेम साक्षरता कार्यक्रमाद्वारे, चित्रपुस्तकांच्या माध्यमातून लहान मुलांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे आणि स्टेम विचारसरणी विकसित करणे या गोष्टी किती प्रभावी ठरू शकतात, हे आम्ही दाखवून दिले आहे. महाराष्ट्रात, आम्ही पिंपरी-चिंचवड

महानगरपालिकेसोबत भागीदारी करून महानगरपालिकेच्या शाळांमध्ये स्टेम विषयावर आधारित वाचन मोहिम राबवली. या मोहिमेत दर आठवड्याला चित्रपुस्तकं आणि प्रत्यक्ष स्टेम उपक्रमांचा समावेश होता. हे उपक्रम सोप्या, तयार सामग्री वापरता येईल अशा पद्धतीने राबवले गेले. शिक्षक आणि मुख्याध्यापकांना गोष्टींमधून वैज्ञानिक संकल्पना कशा समजावून घ्यायच्या याचे प्रशिक्षण दिले गेले. तसेच, व्हॉट्सऍप गटांमुळे शिक्षकांमध्ये परस्पर शिक्षण आणि त्वरित मदतीसाठी एक सक्रिय मंचही तयार झाला.

**दातृत्वाच्या आनंदाबरोबरच अधिक मजबूत संपर्कव्यवस्था :**

PRATHAM BOOKS
donate-a-book

प्रथम बुक्सचा *डोनेट-अ-बुक* हा एक क्राउडफंडिंग मंच आहे. यावर शिक्षक, ग्रंथपाल, स्वयंसेवी संस्था किंवा व्यक्ती निधी गोळा करून मुलांसाठीची ३२हून अधिक भारतीय भाषांमधल्या परवडणारी आणि दर्जेदार चित्रपुस्तकं पोर्टेबल लायब्ररीच्या स्वरूपात मिळवू शकतात.

दहा वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या उपक्रमाचा उद्देश दुर्गम भागातल्या मुलांपर्यंत चित्रपुस्तकं पोहोचवणे हा आहे. या वर्षी व्हिलेज लॅब फाउंडेशनच्या मदतीने लडाखमधल्या नुब्रा व्हॅली येथे पहिले बालवाचनालय स्थापन करण्यात आलं आणि इंग्रजी व भोटी या भाषांमधली २,००० चित्रपुस्तकं विविध ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. इतर महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये आयआयएम वुमन बुक मॅजिक फंडचा समावेश आहे. या उपक्रमाच्या अंतर्गत तीन राज्यांतल्या ६० प्राथमिक शाळांना वाचनालये उपलब्ध करून दिली गेली. तसेच, बेबीज विथ बुक्स रिड-ए-थॉन या उपक्रमाद्वारे पुण्यातल्या भारती हॉस्पिटलच्या एनआयसीयूमध्ये मातांना त्यांच्या नवजात बालकांना वाचून दाखवण्यासाठी चित्रपुस्तकं उपलब्ध करून देण्यात आली.

दान उत्सवाच्या काळात, *डोनेट-अ-बुक* ने सेल्सफोर्स या कंपनीच्या सहयोगाने सोबत ‘सपनों की लायब्ररी’ नावाची कर्मचाऱ्यांसाठीची देणगी मोहीम राबवली. केवळ एका महिन्यातच ३००हून अधिक सेल्सफोर्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी छत्तीसगड, उत्तराखंड आणि झारखंडमधल्या ४,०००हून अधिक वंचित मुलांसाठी वाचनालये उभारण्यास मदत केली.

**क्राउडफंडिंग देणगीचा उपयोग नेमका कसा होतो :**

क्राउडफंडिंगद्वारे दिलेल्या देणगीमुळे नेमका कसा बदल घडतो, हे समजणे कधी कधी कठीण असते. त्यामुळे यावर्षी आमच्या देणगीदारांच्या मदतीने पूर्ण झालेल्या २५०हून अधिक उपक्रमांपैकी एका उपक्रमाची गोष्ट येथे उदाहरणादाखल सांगतो आहोत.

हा अनुभव जेम्स टंग्लट (सॅपलिंग्ज लायब्ररी प्रकल्प) यांनी सांगितला आहे. त्यांनी मणिपूरमधल्या चुराचांदपूर येथे २०० मुलांसाठी निधी संकलन मोहीम आयोजित केली होती.

चुराचांदपूरमधल्या जंगलांनी वेढलेल्या डोंगराळ आणि संघर्षग्रस्त भागातल्या ‘लाईनाट’ नावाच्या बालगृहात काही मुले अशी होती, ज्यांनी कधीही खरेखुरे पुस्तक हातात घेतले नव्हते. त्यांना झोपताना वाचायला चित्रपुस्तकं नव्हती, वर्गात गोष्टी सांगण्याची तासिका नव्हती, आणि वाचनालय तर नव्हतेच. या मुलांपैकी अनेक जण हिंसाचारातून पळून आले होते, काहींनी आई-वडील गमावले होते, तर काही आपल्या कुटुंबापासून वेगळे झाले होते. त्यांना जगाबद्दल जे काही माहीत होते, ते फक्त त्यांच्या आसपासच्या वातावरणातून म्हणजेच कॅम्प, डोंगर आणि शांतता यातूनच मिळाले होते. जेव्हा प्रथम बुक्सकडून चित्रपुस्तकांचे वाचनालय तिथे पोहोचले, तेव्हा बहुसंख्य मुलांनी आयुष्यात पहिल्यांदाच नवीन, स्वच्छ आणि नीटनेटके पुस्तक पाहिले होते. काही मुलांसाठी तर जीवनात पहिल्यांदाच पुस्तक हातात घेण्याचा तो क्षण होता.

मग मुलांनी त्यांच्या सामायिक खोलीत एक कोपरा मोकळा केला. त्यांनी एक जुनं लाकडी कपाट शोधून ते स्वच्छ केलं आणि मिळालेली पुस्तकं त्यात नीट लावली. त्यांच्यासाठी तो फक्त वाचनाचा कोपरा नव्हता, तर तो संधींचा कोपरा होता. गोष्टी, जिज्ञासा, हसू आणि शांतपणे भरून येणाऱ्या जखमांसाठीचा कोपरा. ज्यांनी खूप काही गमावले होते, अशा मुलांसाठी ही मोठ्या जगाकडे पाहण्याची पहिली खिडकी होती. आणि हे परिवर्तन सुरू झालं, कारण आम्ही त्यांना त्यांचं पहिलं पुस्तक देऊ केलं.

डोनेट-अ-बुक का निवडलं, असं विचारल्यावर ते म्हणाले :

“मला डोनेट-अ-बुकबद्दल सर्वात जास्त आवडतं ते म्हणजे, त्यात आपण अनेकदा जी गोष्ट चुकीने गृहीत धरतो, ती वंचित मुलांना आपण प्रत्यक्षात देत असतो - आपल्या जगापलीकडचं नवं जग शोधण्याचा आनंद. एक पुस्तक मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देऊ शकतं, त्यांना आधार देऊ शकतं, त्यांच्या स्वप्नांना प्रेरणा देऊ शकतं, किंवा त्यांनी ज्याची कधी कल्पनाही केली नसेल अशा भविष्याचे दरवाजे उघडू शकतं. हे फक्त साक्षरतेबद्दल मर्यादित नाही, तर हे सन्मान, संधी आणि आशा यांबद्दलही आहे. एखादं मूल जेव्हा पहिल्यांदाच पुस्तक हातात घेऊन म्हणतं, ‘ही गोष्ट माझ्यासाठी आहे,’ तो क्षण अत्यंत उजळून टाकणारा असतो. म्हणूनच हे प्रत्येक वेळी ही गोष्ट आवर्जून करण्यासारखी आहे.”

**१९०० हून अधिक देणगीदार**

**४०,६०० हून अधिक चित्रपुस्तकांचं वितरण**

**२.७ लाखांहून अधिक मुलांवर सकारात्मक परिणाम**



# जनसमुदायांचा उत्सव :

PRATHAM BOOKS
storyweaver

प्रथम बुक्सचा स्टोरीविव्हर हे लहान मुलांच्या शिक्षणासाठी मान्यताप्राप्त डिजिटल साधने पुरवणारा मंच आहे, जिथे कोणीही चित्रपुस्तकं वाचू शकतं, नवी पुस्तकं तयार करू शकतं आणि अनुवादही करू शकतं. या मंचाच्या दहाव्या वर्षातही आम्ही वाचनाचा आनंद पसरवण्यासाठी विविध स्तरांवर सहयोगाची परंपरा वाढवत आहोत.

सरकार, सामाजिक संस्था आणि स्थानिक नेतृत्व यांच्यासोबत काम करून, त्यांच्या माध्यमातून अधिकाधिक मुलांना वाचन चळवळीत सहभागी करून घेतले जाते आहे. राजस्थानच्या शिक्षणविभागासोबतच्या सहयोगाद्वारे स्टोरीविव्हरवरची निवडक हिंदी पुस्तकं प्रखर राजस्थान या उपक्रमाचा भाग बनली. महिनाभर चाललेल्या या मोहिमेमुळे ४,००० हून अधिक वर्गांमध्ये सुमारे ३५,००० पुस्तकांचं वाचन केलं गेलं. एक स्टेप या संस्थेच्या बचपन मनाओ उपक्रमांतर्गत, आम्ही वेबिनार आणि मास्टरक्लासद्वारे ग्रंथपाल, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि अनुवादकांना एकत्र आणलं, ज्यामुळे वाचनाबाबत जागरूकता अधिक वाढली. या भागीदारीमुळे आमचं संपर्क जाळं वाढलं, आम्ही पोचवत असलेला संदेश अधिक प्रभावी झाला. आनंददायी व सर्वसमावेशक वाचन ही एक सामायिक जबाबदारी म्हणून पुढे न्यायला त्यामुळे मदत झाली.

**३७८ हून अधिक भाषा**

**३.२ कोटी वेळा गोष्टींचे वाचन**

**६४,००० हून अधिक कथा**

**उर्दू वाचन चळवळीची सुरुवात :**

महाराष्ट्रातल्या संभाजीनगर येथे प्रादेशिक शिक्षण कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षकांनी प्रथम बुक्सच्या अनुवाद कार्यशाळांमध्ये सहभागी होऊन ८० हून अधिक उर्दू चित्रपुस्तकं तयार केली आणि त्यांचा सक्रियरीत्या वापर सुरू केला. स्टोरीविव्हरचा वापर करून त्यांनी आपल्या वर्गांमध्ये एक उत्साही वाचन चळवळ उभी केली. जिथे शासकीय यंत्रणेचे पाठबळ, स्थानिक सहभाग आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर या गोष्टी एकत्र येतात, तेव्हा मुलांच्या वाचनपद्धतीत दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवून आणला जाऊ शकतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.





## एक दिवस एक गोष्ट : प्रथम बुक्सचा प्रमुख सामुदायिक वाचन उपक्रम

दर वर्षी सप्टेंबरमध्ये, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त आम्ही एक दिवस एक गोष्ट हा उपक्रम साजरा करतो. यात वाचनमित्र (Reading Champions) भारतात आणि परदेशात; शाळा, वाचनालये, उद्याने आणि घरे अशा विविध ठिकाणी-कथाकथन सत्रांचे आयोजन करतात. यावर्षी लोकप्रिय ठरलेली पुस्तकं होती तापाला कसं बरं पळवायचं? (लेखिका : लवलीन मिश्रा, चित्रांकन : प्रिया कुरियन, अनुवाद : रुपाली भावे) आणि गोल! (नेहा सिंग आणि सबा खान, चित्रांकन : अलाफिया हसन आणि पायरो ड्रॉज).

या गोष्टींमुळे विविध ठिकाणचे जनसमुदाय एकत्र आले. १,५०० हून अधिक सदस्यांची भारत, सिंगापूर, दुबई, अमेरिका आणि श्रीलंका येथे सत्रे आयोजित करण्यात आली. आमच्या वाचनमित्रांनी ९,००० हून अधिक सत्रे घेऊन सुमारे ६०,००० मुलांना गोष्टी वाचून दाखवल्या.



**९,००० वाचन सत्रे**

**१,५०० स्वयंसेवक**


**६०,००० मुलांसमोर गोष्टींचे वाचन**







# पुस्तकांना मिळालेले सन्मान :




## आफो आणि मी

पराग सन्मान सूची २०२४

मेहली गोभाई उत्कृष्ट बालचित्रकार पुरस्कार (तिसरी आवृत्ती) – विजेता

बिनोद कानोरिया बालपुस्तक पुरस्कार – नामांकन, प्रारंभिक वाचक (इंग्रजी) ४–७ वर्षे




## चंद्राचा पिझ्झा

कलिंग लिटररी फेस्टिव्हल पुस्तक पुरस्कार २०२४ – नामांकन




## गप्पू गोला (हिंदी)

पराग सन्मान सूची २०२४ (हिंदी)

फिक्की प्रकाशन पुरस्कार २०२३ – वर्षातले सर्वोत्तम बालपुस्तक (१० वर्षांखालील, हिंदी)




## ग्रेस

पराग सन्मान सूची २०२४



## सूर्य आला!

पराग सन्मान सूची २०२४

बिनोद कानोरिया बालपुस्तक पुरस्कार २०२३ – विजेता, प्रारंभिक वाचक (६–८ वर्षे)


ग्रीन लिटरेचर फेस्टिव्हल २०२४ – सालातले पुस्तक (बाल विभाग)







## आमचं वाचनालय

पराग सन्मान सूची २०२४




## चिडकू–मिडकू

अट्टा गलट्टा–बंगळुरू लिटरेचर फेस्टिव्हल पुस्तक पुरस्कार २०२४ – सर्वोत्तम बालचित्रपुस्तक चित्रांकन (नामांकन)




## आम्ही आहोत आशावादी :


### हवामानबदलाविषयी मुलांना काय वाटतं?

पराग सन्मान सूची २०२४




## सूर्यास्त होतो तेव्हा

बिनोद कानोरिया बालपुस्तक पुरस्कार – नामांकन





## जेव्हा आम्ही घरी असतो

पराग सन्मान सूची २०२४

फिक्कीचा प्रकाशनाचा पुरस्कार २०२३ – वर्षातल्या सर्वोत्तम बालपुस्तक (१० वर्षांखालील, इंग्रजी)

नींव पुस्तक पुरस्कार – नामांकन




## अंधाराचा आवाज कसा असतो?

ली ऑफ वर्ड्स – नामांकन (बालसाहित्य, वय ५–१०)

मेहली गोभाई - उत्कृष्ट बालचित्रांकन पुरस्कार – नामांकन





# आमच्या प्रायोजकांचे आभार

APRAAVA ENERGY

दूरbeen

EBARA ELLIOTT ENERGY

H T Parekh FOUNDATION

infoedge

P·A·N·I Foundation giving hope a chance

parag AN INITIATIVE OF TATA TRUSTS

UST

Wildlife Conservation Trust

enphase ENERGY

# FINANCIAL DECLARATION

Donors List consisting of donations received more than Rs. 50,000 in the year as well as Major Donors supported projects implemented during the year

| | Name of the Donors |
|---|---|
| | Rohini Nilekani Philanthropies Foundation |
| | Caterpillar India Engineering Solutions Private Limited |
| | HT Parekh Foundation |
| | King Baudouin Foundation |
| | UK Online Giving Foundation |
| | Ashajyothi USA Inc |
| | Infoedge India Limited |
| | Shopify Commerce India Private Limited |
| | Wildlife Conservation Trust |
| | Enphase Solar Energy Private Limited |
| | Sir Dorabji Tata Trust |
| | United Way Bengaluru |
| | Elliott Ebara Turbomachinery India Pvt Ltd |
| | Kohima-Mariani Transmission Limited |
| Individual | Collis Ta'eed |
| | Nayara Energy Limited |

| | Name of the Donors |
|---|---|
| | Raay Foundation |
| Individual | Shweta Helen Robert |
| | Mayuresh Sharad Shirgoakar |
| | H & R Block India Private Limited |
| | The Online Giving Foundation |
| | Liferarian Association |
| Individual | Shubh Arambh Foundation |
| Individual | Balaji Radhakrishnan |
| Individual | Tarvinder Singh |

List of individual donors

## आर्थिक वर्ष २०२४–२५ मधले विश्वस्त मंडळ

| नावे | पदे | बैठकींना उपस्थिती (संख्या): | विश्वस्तांना मिळालेले मानधन/ खर्चाची परतफेड: |
|---|---|---|---|
| अशोक कामत | विश्वस्त | ४ | शून्य |
| हरित नागपाल | विश्वस्त | २ | शून्य |
| मीनाक्षी रमेश | विश्वस्त | १ | शून्य |
| एम. एस. श्रीराम | विश्वस्त | ३ | शून्य |
| आर. श्रीराम | अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त | ४ | शून्य |
| श्रीकांत नादमुनी | विश्वस्त | ४ | शून्य |
| सुझान सिंग | विश्वस्त | ४ | शून्य |

या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या एकूण ४ बैठका घेण्यात आल्या- त्या १० जुलै २०२४, २० सप्टेंबर २०२४, ४ डिसेंबर २०२४ आणि २६ मार्च २०२५ रोजी झाल्या. सर्व बैठकींचे अहवाल व्यवस्थित नोंदवून प्रसारित करण्यात आले.

श्रीमती परवीन वर्मा यांनी २६ मार्च २०२५ रोजी विश्वस्त मंडळाचा राजीनामा दिला.

Pratham Books

Balance sheet as at March 31, 2025

(Amount in Rupees)

| Particulars | Sch No. | As at March 31, 2025 Amount | As at March 31, 2024 Amount |
|---|---|---|---|
| **Liabilities** | | | |
| Own Funds | 1 | 12,46,50,623 | 11,47,17,119 |
| Specified Fund | 2 | 39,63,649 | 73,66,019 |
| Current Liabilities | 3 | 1,44,79,398 | 1,60,15,456 |
| Provisions | 4 | 43,31,243 | 46,26,718 |
| Other advances | 5 | 1,46,959 | 21,65,806 |
| Total | | 14,75,71,872 | 14,48,91,118 |
| **Assets** | | | |
| Fixed Assets | 6 | 20,40,055 | 19,80,392 |
| Deposits | 7 | 11,13,52,212 | 8,46,43,096 |
| Debtors | 8 | 44,26,783 | 24,79,991 |
| Loans and advances | 9 | 10,83,806 | 25,06,917 |
| Stock of Books | | 92,88,505 | 83,22,808 |
| Cash in Hand | | 29,099 | 15,762 |
| Cash at Bank | 10 | 1,88,44,153 | 4,44,69,456 |
| Specified Fund Receivable | 11 | - | 1,50,000 |
| Other Current Assets | 12 | 5,10,260 | 3,21,696 |
| Total | | 14,75,71,872 | 14,48,91,118 |

Significant Accounting Policies and notes to accounts 22

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Ashok R Kamath
Trustee

Bengaluru
September 24, 2025

As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No 003867S/ S200094

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235431
UDIN: 25235431BMLABR2342

Bengaluru
September 24, 2025

Pratham Books

Income & Expenditure for the year ended March 31, 2025

*(Amount in Rupees)*

| Particulars | Sch No. | For the period from 1st April 2024 to 31st March 2025 | For the period from 1st April 2023 to 31st March 2024 |
|---|---|---|---|
| **Income** | | | |
| Sale of Books | 13 | 5,05,96,400 | 6,19,87,671 |
| Donations received | 14 | 5,11,70,541 | 50,15,192 |
| Other income | 15 | 50,89,671 | 67,72,563 |
| Income from Funds | 16 | 2,02,27,098 | 4,60,99,569 |
| Total (A) | | 15,20,85,611 | 14,79,25,727 |
| **Expenditure** | | | |
| Book Development & StoryWeaver Expenses | 17 | 5,34,74,035 | 2,91,23,257 |
| Selling & Administrative Expenses | 18 | 2,57,86,036 | 2,27,31,803 |
| Staff Expenses | 19 | 3,14,82,774 | 3,69,18,902 |
| Promotional Expenses | 20 | 6,43,438 | 2,47,544 |
| Depreciation | 6 | 5,07,709 | 5,07,823 |
| Fund Expenditure | 21 | 3,14,79,488 | 6,87,17,139 |
| Total (B) | | 14,64,04,477 | 17,67,96,500 |
| Excess of income over expenditure (A-B) | | 56,81,134 | (2,88,70,773) |
| Add: | | | |
| **Opening Balance in Funds** | | | |
| Opening Balance in Corpus Fund | | 11,47,17,121 | 10,11,48,543 |
| Opening Balance in Specified Fund | | 73,60,019 | 5,03,21,352 |
| **Balance of Funds after appropriations** | | | |
| Corpus Fund | | 12,46,55,024 | 11,47,17,120 |
| Specified Fund | | 39,03,249 | 73,60,019 |
| **Total balance in Funds** | | 12,85,58,273 | 12,20,83,139 |
| Significant Accounting Policies and notes to accounts | 22 | | |

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Ashok R Kamath
Trustee

As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No [illegible]

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235401
UDIN: [illegible]

Bengaluru
September 24, 2025

Bengaluru
September 24, 2025

Pratham Books

Receipts and Payments account for the year ended March 31, 2025

*(Amount in Rupees)*

| Particulars | Sch no. | Year ended March 31, 2025 Amount | Year ended March 31, 2024 Amount |
|---|---|---|---|
| **Receipts** | | | |
| Balance brought forward | | | |
| - Cash on hand | | 13,763 | 13,440 |
| - Cash at bank | | 4,44,09,456 | 5,95,10,284 |
| Sale of Books | | 6,46,37,778 | 8,98,95,514 |
| Donations | | 5,11,70,541 | 50,15,193 |
| Other income | | 37,92,201 | 57,68,526 |
| Specified Funds | | 1,63,27,098 | 4,68,22,561 |
| Fixed Deposits - Withdrawn | | 11,45,08,984 | 19,93,61,224 |
| Gratuity Fund (LIC) | | 2,82,943 | 1,42,213 |
| Income Tax Refund - Received (TDS) | | 14,27,910 | - |
| Total | | 34,36,70,734 | 40,38,08,273 |
| **Payments** | | | |
| Book Development Expenses | | 3,11,34,075 | 2,68,14,513 |
| Selling, Administrative Expenses and Promotional Expenses | | 1,65,72,883 | 2,23,51,148 |
| Staff Expenses | | 3,14,23,040 | 2,94,13,827 |
| Fund Expenditure | | 3,17,34,689 | 6,14,45,364 |
| Fixed assets Purchased | | 3,47,403 | 3,09,960 |
| Fixed Deposits | | 17,10,25,301 | 18,76,17,567 |
| Gratuity LIC Policy | | 8,00,000 | 10,00,000 |
| Specific Grant Balance Refund | | - | 1,75,000 |
| Earnest Money/Security Deposit | | 5,70,000 | - |
| Balance carried forward | | | |
| - Cash on hand | | 75,299 | 13,763 |
| - Cash at bank | | 1,05,64,153 | 4,44,09,456 |
| Total | | 34,36,70,734 | 40,38,08,273 |
| Significant Accounting Policies and notes to accounts | 22 | | |

for Pratham Books

R Sriram
Chairperson

Ashok R Kamath
Trustee

As per our report of even date
for Singhvi Dev & Unni LLP
Chartered Accountants
Firm Reg No [illegible]

Shashi Kumar H D
Partner
Membership No.: 235401
UDIN: [illegible]

Bengaluru
September 24, 2025

Bengaluru
September 24, 2025

# चित्रांकन श्रेय

| पुस्तकाचे नाव | चित्रकार | लेखक |
|---|---|---|
| पुस्तकांनी भरलेलं घर | ऐंद्री सी. | जयराज सिंग |
| मुंग्यांनी भरलेला चांदोबा | प्रिया कुरियन | अपर्णा कपूर |
| माझ्या तारकाविश्वात आहे कृष्णविवर | छाया प्रभात | अनन्या दासगुप्ता |
| वेध डायनोसोरचा | गिना जेम्स | अंजली अलाप्पट |
| कबड्डी कबड्डी | कबिनी अमीन | कबिनी अमीन |
| एकाच आकाशाखालची स्वप्नं | ओगिन नयम | फाउस्तो आर्या डे सॅन्टिस |
| मी मांजर नाहीये | डेविड याम्बेम | पारो आनंद |
| डॉर्डल्सची इंधनबचत | ऐंद्री सी. | सी.जी. सलामंदर |
| मला करडा रंग खूप आवडतो | कनातो जिमो | कनातो जिमो |
| आम्हाला काय वाटतं? | गीतांजली दास, जपानी श्याम, कामता ताहेड, कृतिक जोशी, लाडोबाई आणि मीनाक्षी वायेदा | |

या अहवालाला आकर्षक दृश्यरूपात साकारण्याबद्दल आम्ही कनातो जिमो यांचे मन:पूर्वक आभार मानतो.







**PRATHAM BOOKS**
A Book in Every Child's Hand

House No. 333, First Floor,
4th Cross OMBR Layout,
Banaswadi
T: 80- 42052574 / 4115 9009

www.prathambooks.org
www.storyweaver.org.in
www.donateabook.org.in